क्रमांक :८७

# महाराष्ट्र विधानपरिषद

## पत्रक भाग दोन

**गुरुवार, दिनांक ३१ मार्च, २०२२/चैत्र १० शके,१९४४**

**शासकीय विश्रामगृह, महाबळेश्वर येथील कक्षबंधाचे आरक्षण**

८८. महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सर्व सदस्यांना कळविण्यात येते की, यावर्षी दिनांक **१ एप्रिल, २०२२ ते दिनांक १५ जून, २०२२** या कालावधीकरिता शासकीय विश्रामगृह, महाबळेश्वर येथील १० कक्षबंध महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाकडे सुपूर्द करण्यात आले आहेत. उपलब्ध असलेले कक्षबंध, आरक्षणाचा कालावधी तसेच महाराष्ट्र विधानमंडळाच्या विविध समित्या व सदस्यांची संख्या लक्षात घेता एका सदस्यांसाठी उक्त कालावधीत एका विशेष कक्षाचे फक्त तीन दिवसांचे आरक्षण उपलब्धतेनुसार प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्वावर करण्यात येईल.

**ज्या सन्मा.सदस्यांना उक्त कालावधीत कक्षबंधांचे आरक्षण हवे असेल त्यांनी संसदीय आयुधांकरिता उपलब्ध करुन देण्यात आलेला त्यांचा लॉगईन आयडी वापरुन संगणक प्रणालीवर संपूर्णत: Online पध्दतीने, ज्या दिवसाकरिता आरक्षण हवे असेल त्याच्या कमीत कमी तीन दिवस अगोदर आरक्षण करावे** अशी त्यांना विनंती करण्यात येत आहे. आरक्षण केवळ ऑनलाईन पद्धतीने करता येईल. पत्राद्वारे किंवा ऑफलाईन पध्दतीने आरक्षणाची सुविधा उपलब्ध असणार नाही.

विधानमंडळ सचिवालयाकडे सुपुर्द करण्यात आलेले विधानमंडळ सदस्य व विधानमंडळ समित्यांवरील सदस्यांसाठी राखीव असल्याने विधानमंडळ समित्यांच्या बैठकी महाबळेश्वर येथे घ्यावयाचे ठरविल्यास संबंधित समिती सदस्यांव्यतिरिक्त अन्य सदस्यांसाठी आरक्षित केलेल्या कक्षाबंधाचे आरक्षण रद्द करण्याचे अधिकार महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाने राखून ठेवले आहेत.

---

**विधानभवन,**
मुंबई,
दिनांक : ३१ मार्च, २०२२

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव**
महाराष्ट्र विधानपरिषद

**याची प्रत :**

१) महाराष्ट्र विधानपरिषदेचे सर्व सदस्य.
२) मा.सभापती व मा.उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव व खाजगी सचिव.
३) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव.
४) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व सर्व कक्ष.
५) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
६) संगणक कक्ष ( Website )